लोकमत
औरंगाबाद, बुधवार,
दि. २६ डिसेंबर २०१८

# 'जवाहर' च्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिराला प्रारंभ



लोकमत न्यूज नेटवर्क

अणदूर : येथील जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने २४ ते ३० डिसेंबर या कालावधीमध्ये विशेष शिबीर खुदावाडी येथे घेण्यात येत आहे. याअंतर्गत मंगळवारी ग्रामस्थांसोबत बैठक घेऊन गाव स्वच्छतेला सुरुवात करण्यात आली.

शिबिराचे उद्घाटन सोलापूर जिल्हा सर्वोदय मंडळाचे अध्यक्ष नरेश बदनोरे आणि माजी आमदार सि. ना.आलुरे गुरुजी यांच्या हस्ते झाले. संस्थेचे कोषाध्यक्ष गो.का.बिच्चे गुरुजी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.उमाकांत चनशेट्टी, सामाजिक कार्यकर्ते डॉ.सिद्रामप्पा खजुरे व खुदावाडीचे सरपंच शरद नरवडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांनी प्रास्ताविकामध्ये शिबिरातील उपक्रमांची माहिती दिली. सूत्रसंचालन प्रा. डॉ. एम. बी. बिराजदार यांनी केले तर आभार प्रा. एस. डी. आगलावे यांनी मानले. शिबिरासाठी रासेयोचे जिल्हा समन्वयक प्रा. एस. डी. आगलावे व कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ. राठोड जी. टी. यांनी पुढाकार घेतला आहे.

उस्मानाबाद. शुक्रवार, २८ डिसेंबर २०१८।

# जवाहर महाविद्यालयाचे खुदावाडीत राष्ट्रीय सेवा योजना शिबिरास प्रारंभ

प्रतिनिधी | नळदुर्ग

तुळजापूर तालुक्यातील खुदावाडी येथे जवाहर महाविद्यालय (अणदूर ) व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने सेवा योजना शिबिरास प्रारंभ करण्यात आले. तसेच उपस्थित मान्यवरांच्या हस्ते 'जवाहर' वार्तापत्राच्या विशेष अंकाचे प्रकाशनही करण्यात आले.

खुडावाडी येथे चालणाऱ्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिर सुरू झाले असून ते ३० डिसेंबर या कालावधीत जलसंवर्धन, जल व्यवस्थापन, स्वच्छता मोहीम; शेतकरी मेळावा, महिला मेळावासह विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाणार आहेत. या शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी माजी आमदार सि. ना. आलुरे गुरुजी यांचा हस्ते दीप प्रज्वल करून करण्यात आले. याप्रसंगी सोलापूर सर्वोदय मंडळाचे अध्यक्ष प्रा. नरेश बदनोरे, जवाहर महाविद्यालयाचे प्राचार्य उमाकांत चनशेट्टी, मुख्याध्यापक संगमेश्वर जळकोटे, माजी प्राचार्य डॉ. अनिता मुदकन्ना, सामाजिक कार्यकर्ते डॉ. सिद्रामप्पा खजुरे, सरपंच शरद नरवडे, उपसरपंच पांडुरंग बोंगरगे, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष शिवाप्पा जवळगे, सोसायटीचे चेअरमन तुकाराम बोंगरगे, माजी सरपंच रेवणसिध्द स्वामी, पोलिस पाटील बसवेश्वर सांगवे, महादेव चिंचोले, विश्वं बोंगरगे आदीसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित होते. जलसंवर्धन, जल व्यवस्थापन, स्वच्छता मोहीम, शेतकरी मेळावा, महिला मेळावासह विविध कार्यक्रमाचे आयोजन केले जाणार आहेत.

पुण्य नगरी
गुरूवार,२७ डिसेंबर २०१८ उस्मानाबाद

# खुदावाडी येथे रासेयो शिबिराचे उद्घाटन

पुण्य नगरी । वृत्तसेवा

**खुदावाडी:** तुळजापूर तालुक्यातील खुदावाडी येथे जवाहर महाविद्यालय अणदुर व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजना शिबिरास प्रारंभ झाला आहे. प्रारंभी माजी आ. सि. ना. आलुरे यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते जवाहर वार्तापत्राच्या विषेशांकाचे प्रकाशन करण्यात

माजी आ. आलुरे यांची उपस्थिती



आले. यावेळी सरपंच शरद नरवडे, उपसरपंच पांडुरंग बोंगरगे, सर्वोदय मंडळाचे अध्यक्ष प्रा. नरेश बदनोरे, जवाहर महाविद्यालयाचे प्राचार्य उमाकांत चनशेट्टी, मुख्याध्यापक संगमेश्वर जळकोटे, सेवानिवृत्त प्राचार्य अनित मुदकन्ना, डॉ. सिद्रामप्पा खजुरे, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष शिवाप्पा जवळगे, तुकाराम बोंगरगे, रेवणसिध्द स्वामी, बसवेश्वर सांगवे महादेव चिंचोले, विश्व बोंगरगे आदींस ग्रामस्थ उपस्थित होते.

बुधवार, दि. २६ डिसेंबर २०१८
आदर्श गावकरी

# खुदावाडी येथे रासेयो शिबिराचे उद्घाटन



**अणदूर / प्रतिनिधी**

तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथील जवाहर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे खुदावाडी येथे वार्षिक विशेष शिबिराचे सोमवारी (दि. २४) उद्घाटन झाले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार तथा शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव सि.ना.आलुरे गुरुजी तर प्रमुख पाहुणे म्हणून गो.का.बिच्वे गुरुजी, सेवानिवृत्त प्राचार्य नरेश बदनोरे, प्राचार्य डॉ.उमाकांत चनशेट्टी, डॉ. सिद्रामप्पा खजुरे, खुदावाडीचे सरपंच शरद नरवडे यांची उपस्थिती होती. दि.२४ ते ३० डिसेंबर या कालावधीत हे शिबीर सुरू आहे. यासाठी जलसंवर्धन व जल व्यवस्थापनासाठी युवक हा विषय घेण्यात आला आहे. कार्यक्रमाला प्राध्यापक, कर्मचारी, संत विनोबा भावे विद्यालयाचे मुख्याध्यापक आर.साखरे, मुख्याध्यापक संगमेश्वर जळकोटे यांच्यासह ज्येष्ठ नागरिक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. डॉ. एम. बी. बिराजदार तर आभार प्रा. एस. डी. आगलावे यांनी मानले. शिबीर यशस्वितेसाठी एनएसएसचे जिल्हा समन्वयक प्रा. एस. डी. आगलावे, कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. जी. टी. राठोड प्रयत्न करत आहेत.

दिव्य मराठी

उस्मानाबाद, शनिवार, २३ जून २०१८ | ३

## जवाहर विद्यालयाचा योगदिन साजरा

अणदूर येथील जवाहर महाविद्यालयाने गुरुवारी (दि.२१) सकाळी श्री श्री रविशंकर विद्यामंदिरच्या वतीने जागतिक योग दिन बसवेश्वर वसतिगृहासमोरील प्रांगणावर साजरा केला. शालेय महाविद्यालयीन विद्यामंदिरातील विद्यार्थी, पालक, शिक्षक यांच्या उपस्थितीत प्रा. बिराजदार, प्रा. आगलावे, मु.अ. संगमेश्वर जळकोटे, जयहिंद पवार यांनी योगाचे प्रात्यक्षिक दिले तर लक्ष्मण नरे यांनी समालोचन केले. या योग कार्यक्रमासाठी शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव सि. ना. आलुरे गुरुजी, संचालक गोपीनाथ बिच्चे, मारुती खोबरे, श्रीमंत मुळे तसेच प्राचार्या जाधव, प्राध्यापक वर्ग, रविशंकर विद्यामंदिराचे मु.अ. व शिक्षक उपस्थित होते. योगासनानंतर सि. ना. आलुरे गुरुजी यांनी अध्यक्षीय समारोपात व्यायाम आणि योगा जीवनात किती महत्वाचे आहे हे सांगितले व योगा नियमित करणे आवश्यक असल्याचे स्पष्ट केले. या जागतिक योग दिनाच्या कार्यक्रमासाठी जवाहर विद्यालयातील शिक्षकासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दै. दिव्य मराठी

## 'मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त विविध कार्यक्रम'

अणदूर । भाषा माणसाला समृद्ध करते म्हणून भाषेला जिवंत ठेवण्याचे कार्य मानवाला करायचे आहे. मराठी भाषा अत्यंत सुंदर आहे. चार हजार भाषा आणि साठ हजार बोलीत मराठी "माऊली" म्हणून कार्य करत आहे, असे मत प्रा. डी. एल. भोवाळ यांनी व्यक्त केले. अणदूर येथील जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील मराठी भाषा विभागाने १ ते १५ जानेवारी या कालावधीत 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' या निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन केले होते. अध्यक्षस्थानी प्राचार्या डॉ. मीना जाधव होत्या. यावेळी डॉ. एम. बी. बिराजदार, डॉ. अनिता मूदकणा, प्रा. प्रसन्न कंदले, डॉ. बी. एन. गटलेवार, प्रा. एस. आर. भारती, डॉ. एस. एस. बाड, डॉ. एस. के. कुलकर्णी आदींची उपस्थिती होती.

दिनांक 22/06/2018

## अणदूरमध्ये योगदिनाचा उत्साह

◆ अणदूर : येथील जवाहर विद्यालय, आर्ट ऑफ लिव्हिंग व रविशंकर विद्यामंदिर यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक योगदिन उत्साहात साजरा करण्यात आला. यामध्ये ८५ वर्षीय माजी आमदार सि. ना. आलुरे गुरुजी यांनी सहभाग घेऊन तब्बल दोन तास योगासने केल्याने सर्वांचे लक्ष वेधून घेऊन युवकांना व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. जवाहर क्रीडांगणावर झालेल्या कार्यक्रमात आर्ट ऑफ लिव्हिंग परिवार, जवाहर विद्यालय-महाविद्यालय विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापक, ग्रामस्थ, विविध संस्था संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते. त्यामध्ये माणिक आलुरे, मारुती खोचरे, श्रीमंत मुळे, प्रा. संगमेश्वर जळकोटे, प्राचार्या जाधव, योगशिक्षक लक्ष्मण नरे, एम. बी. बिराजदार, प्रा. आगलावे आदींची प्रमुख उपस्थिती होती.


लोकमत औरंगाबाद, शुक्रवार, दि. २२ जून २०१८ ३

# अणदुरात सामूहिक योगदिन

लोकमत न्यूज नेटवर्क

अणदूर : येथील जवाहर विद्यालय, जवाहर महाविद्यालय, श्री श्री रविशंकर विद्यामंदिर, अणदूर यांच्या वतीने बसवेश्वर वसतिगृहासमोरील प्रांगणावर 'जागतिक योग दिन' साजरा करण्यात आला. यात शालेय महाविद्यालयीन, विद्यामंदिरासह हजारावर विद्यार्थी, पालक, शिक्षक उपस्थित होते.

योगाचे प्रात्यक्षिक प्रा. बिराजदार, आगलावे, मुख्याध्यापक संगमेश्वर जळकोटे, जयहिंद पवार, प्रत्येक प्रकाराचे समालोचन लक्ष्मण नरे यांनी केले. या कार्यक्रमासाठी संस्थापक सि.ना. आलुरे गुरुजी, संचालक गोपीनाथ बिच्चे, मारुती खोबरे, श्रीमंत मुळे, ज्येष्ठ नागरिक, विविध संस्थांचे पदाधिकारी, जवाहर विद्यालयाचे मुख्याध्यापक संगमेश्वर जळकोटे, सर्व शिक्षक, प्राचार्या जाधव, सर्व प्राध्यापक, श्री श्री रविशंकर विद्यामंदिराचे मुख्याध्यापक, शिक्षक आदींनी सहभाग नोंदविला. योगासने झाल्यावर आलुरे गुरुजी यांनी अध्यक्षीय समारोपात व्यायाम आणि योगाचे महत्त्व समजावून सांगितले. कार्यक्रमासाठी जवाहर विद्यालयातील क्रीडा शिक्षक जयहिंद पवार राठोड, प्रवीण गुरव, अमित चौधरी, उमेश चंदनशिवे सर्व शिक्षकांनी पुढाकार घेतला.



अणदूर येथे आयोजित सामुहिक योग शिबिरात विविध शाळांच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

---

७

गुरुवार, दि. २५ जानेवारी २०१८

# जीवनात समस्यांना मोठे करू नका : प्रा.

अणदूर, (प्रतिनिधी) : टाक्याचे घाव सोसल्याशिवाय देवपण येत नाही. जीवनात अनेक समस्या येतात. जीवनात जे समस्यांना मोठे करू नका. जीवनात जे चांगले आहे, त्याचाच स्वीकार करा. तुम्हाला काहीही कमी पडणार नाही. ज्ञानी व्हा. कर्माच्या मार्गावर चला. वेळ गेल्यानंतर पश्चात्ताप करण्यापेक्षा वेळेअगोदर काम करा, असे मत वसंतराव काळे महाविद्यालय ढोकीचे प्राचार्य हरिदास फेरे यांनी व्यक्त केले.

जवाहर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिराच्या समारोप समारंभाप्रसंगी ते बोलत होते. शिक्षण प्रसारक मंडळ अणदूर संचलित जवाहर कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, अणदूर राष्ट्रीय सेवा योजना आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'ग्रामस्वच्छता ग्राम सर्व्हेक्षणासाठी युवा' या वार्षिक विशेष शिबिराचे जळकोट (ता.तुळजापूर) याठिकाणी आयोजन करण्यात आले होते. या शिबिराच्या समारोप समारंभाच्या अध्यक्षस्थानी बालाघाट शिक्षण संस्थेचे संचालक रामचंद्र आलुरे उपस्थित होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून राष्ट्रीय सेवा योजनेचे गटसमन्वयक राम कदम, जळकोटचे उपसरपंच अर्जुन आबा कदम, महात्मा गांधी तंटामुक्त समितीचे अध्यक्ष यशवंतराव पाटील, मुरूम येथील विजय हिरमुखे त्याचबरोबर जवाहर महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. मीना जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक तथा कार्यक्रम अधिकारी प्राध्यापक सूर्यकांत आगलावे यांनी एन.एस.एस. विभागाच्या वतीने १७ जानेवारी पासून जळकोट गावामध्ये केलेल्या कामाची सविस्तर माहिती दिली.



हे काम करत असताना जळकोट ग्रामस्थांचे खूप चांगले सहकार्य मिळाले आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले. यावेळी उपस्थित मान्यवरांनीही आपल्या मनोगतात जवाहर महाविद्यालयाच्या वतीने झालेल्या कामाची स्तुतीही केली.

यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबिरार्थी गणेश मुळे, सागर चव्हाण यांनीही मनोगत व्यक्त केले. सुदर्शन शिंदे या विद्यार्थ्याने पाहुण्यांचा परिचय करून दिला.

शिबीर यशस्वी करण्यासाठी प्रा. डॉ. जी. टी. राठोड यांच्यासह जवाहर महाविद्यालयाचे प्रा. डॉ. राजशेखर नळगे, प्रा. प्रसन्न कंदले, प्राध्यापक डॉ. डी. एन. गटलेवार, प्रा. डॉ. एम. बी. बिराजदार, प्रा. डॉ. अनिता विवेकानंद वा बी. कदम य कार्यक्रमाचे स एस. प्रतिनिध यांनी केले. बी. बिराजदा वंदे मातरम् सांगता झाल

लोकमत औरंगाबाद, रविवार, दि. २८ जानेवारी २०१८ ४

विद्यार्थ्यांनी कला सादरीकरण केले. सूत्रसंचालन एनसीसी विभागप्रमुख प्रवीण गुरव, भालेराव यांनी केले. या कलाकारांना प्रा. प्रसन्न कंदले आणि एम.एन. माळवदकर यांनी संगीताची सवाद्य साथ दिली.

आलूर प्रशाला

माजी सदस्या पार्वती घोडके, प्राचार्या डॉ. मीना जाधव, संस्थेचे संचालक गो. का. बिच्चे, पं.स. सदस्या वैशाली मुळे, जवाहर विद्यालयाचे मुख्याध्यापक संगमेश्वर जळकोटे, बालाघाट शिक्षण संस्थेचे संचालक रामचंद्र आलुरे, माजी सरपंच धनराज मुळे यांची प्रमुख उपस्थिती होती. जवाहर महाविद्यालयाच्या प्रांगणात अणदूर येथील फिनिक्स इंग्लिश स्कूल, श्रीश्री रविशंकर विद्यामंदिर, जिल्हा परिषद कन्या शालेच्या

जवाहर महाविद्यालय

अणदूर : येथील जवाहर महाविद्यालयाच्या प्रांगणामध्ये प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने विविध कला गुणदर्शनाचा कार्यक्रम घेण्यात आला. अध्यक्षस्थानी सरपंच सरिता मोकाशे या होत्या, तर प्रमुख अतिथी म्हणून माजी आमदार तथा शिक्षण प्रसारक मंडळ अणदूरचे सचिव सि. ना. आलुरे गुरुजी, सेवानिवृत्त पोलिस उपायुक्त सुरेश कंदले, डीसीसी बँकेचे संचालक सुनील चव्हाण, जि.प.चे

सकाळ
औरंगाबाद, शुक्रवार, २६ जानेवारी २०१८
३

## जवाहर महाविद्यालयाच्या शिबिराचा समारोप

जळकोट, ता. २५ (बातमीदार) : अणदूर येथील जवाहर महाविद्यालयाच्या जळकोट (ता. तुळजापूर) येथे आयोजित राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या शिबिराचा समारोप प्राचार्य डॉ. हरिदास फेरे यांनी केला. ढोकी येथील वसंतराव काळे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हरिदास फेरे यांची प्रमुख उपस्थिती होती. बालाघाट शिक्षण संस्थेचे संचालक रामचंद्र आलुरे अध्यक्षस्थानी होते. या वेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे गटसमन्वयक राम कदम, जळकोटचे उपसरपंच अर्जुन आबा कदम, महात्मा गांधी तंटामुक्त गाव समितीचे अध्यक्ष यशवंत पाटील, मुरूम येथील विजय हिरमुखे, जवाहर महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. मीना जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक तथा कार्यक्रम अधिकारी प्रा. सूर्यकांत आगलावे यांनी प्रास्ताविक केले. शिबिरासाठी प्रा. डॉ. जी. टी. राठोड, प्रा. डॉ. राजशेखर नळगे, प्रा. प्रसन्न कंदले, प्रा. डॉ. डी. एन. गटलेवार, प्रा. डॉ. एम. बी. बिराजदार, प्रा. डॉ. अनिता मुदकन्ना, प्रा. डॉ. विवेकानंद वाहुळे, प्रा. डॉ. ए. बी. कदम यांनी पुढाकार घेतला. ऋषिकेश घोडके याने सूत्रसंचालन केले. प्रा. डॉ. एम. बी. बिराजदार यांनी आभार मानले.

माणदेश नगरी

## जवाहर महाविद्यालय

अणदूर : येथील जवाहर महाविद्यालयाच्या प्रांगणा मध्ये प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने विविध कला गुणदर्शनाचा कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अणदूर गावच्या सरपंच सौ सरिता मोकाशे या होत्या तर प्रमुख अतिथी म्हणून माजी आमदार तथा शिक्षण प्रसारक मंडळ अणदूरचे सचिव सि ना आलुरे गुरुजी, सेवानिवृत्त पोलिस उपायुक्त सुरेश कंदले, उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक सुनील चव्हाण, माजी जिल्हा परिषद सदस्य पार्वती घोडके, जवाहर महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.मीना जाधव, संस्थेचे संचालक गो.का. बिच्चे गुरुजी पंचायत समिती सदस्य वैशालीताई मुळे, जवाहर विद्यालयाचे मुख्याध्यापक संगमेश्वर जळकोटे, बालाघाट शिक्षण संस्थेचे संचालक रामचंद्र आलुरे, माजी सरपंच धनराज मुळे यांची प्रमुख उपस्थिती होती. जवाहर महाविद्यालयाच्या प्रांगणात प्रतिवर्षाप्रमाणे याहीवर्षी अणदूर येथील फीनिक्स इंग्लिश स्कूल, श्री श्री रविशंकर विद्यामंदिर, जिल्हा परिषद कन्या शालेच्या विद्यार्थ्यांनी कला सादरीकरण केले . आज झालेल्या सांस्कृतिक कार्यक्रमात रविशंकर विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी केलेल्या शेतकरी नृत्याने उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाचे वैशिष्ट्य ठरले ते म्हणजे जवाहर विद्यालयाच्या एनसीसी बटालियनने केलेले सादरीकरण. या सांस्कृतिक कार्यक्रमात जवाहर विद्यालय,फीनिक्स इंग्लिश स्कूल ,रविशंकर विद्यामंदिर, जि. प.कन्या शाळेच्या विद्यार्थ्यांनी कवायत प्रकार, लेझिम, नृत्य,नाटिका सादरीकरण इत्यादी कलेचे सादरीकरण केले या सांस्कृतिक कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एन.सी.सी.विभाग प्रमुख प्रवीण गुरव,भालेराव गुरुजी यांनी केले. यासाठी अणदूर व परिसरातील एक ते दिड हजार विद्यार्थी व पालकांनी आपली उपस्थिती दर्शविली. या कलाकारांना प्रा.प्रसन्न कंदले आणि एम.एन.माळवदकर यांनी संगीताची सवाद्य साथ दिली.

## माढा न.पं.

माढा : नागरपंचायतच्या वतीने शहरातील नागरिकांत राष्ट्रीय भावना

---

दै. दिव्य मराठी

# 'मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त विविध कार्यक्रम'

अणदूर । भाषा माणसाला समृद्ध करते म्हणून भाषेला जिवंत ठेवण्याचे कार्य मानवाला करायचे आहे. मराठी भाषा अत्यंत सुंदर आहे. चार हजार भाषा आणि साठ हजार बोलीत मराठी "माऊली' म्हणून कार्य करत आहे, असे मत प्रा. डी. एल. भोवाळ यांनी व्यक्त केले. अणदूर येथील जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील मराठी भाषा विभागाने १ ते १५ जानेवारी या कालावधीत 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' या निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन केले होते. अध्यक्षस्थानी प्राचार्या डॉ. मीना जाधव होत्या. यावेळी डॉ. एम. बी. बिराजदार, डॉ. अनिता मूदकणा, प्रा. प्रसन्न कंदले, डॉ. बी. एन. गटलेवार, प्रा. एस. आर. भारती, डॉ. एस. एस. बाड, डॉ. एस. के. कुलकर्णी आदींची उपस्थिती होती.

गुरुवार, दि. २५ जानेवारी २०१८

# 'जवाहर'च्या रासेयो शिबिराचा समारोप समारंभ



**अणदूर / प्रतिनिधी**

येथील जवाहर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचा समारोप समारंभ नुकताच संपन्न झाला. 'ग्रामस्वच्छता ग्राम सर्वेक्षणासाठी युवा' या वार्षिक विशेष शिबिराचे जळकोट या ठिकाणी आयोजन करण्यात आले होते.

या शिबिराच्या समारोप समारंभाच्या अध्यक्षस्थानी बालाघाट शिक्षण संस्थेचे संचालक रामचंद्र आलुरे हे उपस्थित होते.

प्रमुख अतिथी म्हणून राष्ट्रीय सेवा योजनेचे गटसमन्वयक राम कदम, जळकोटचे उपसरपंच अर्जुन आबा कदम, महात्मा गांधी तंटामुक्त समितीचे अध्यक्ष यशवंतराव पाटील, मुरूम येथील विजय हिरमुखे त्याचबरोबर जवाहर महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. मीना जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी वसंतराव काळे महाविद्यालय ढोकीचे प्राचार्य हरिदास फेरे यांच्यासह मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ऋषिकेश घोडके तर आभार प्रा. डॉ एम.बी. बिराजदार यांनी मानले.

शनिवार, दि. २० जानेवारी २०१८

# जवाहर महाविद्यालयाच्या रासेयो शिबिराचे उद्घाटन

**अणदूर/प्रतिनिधी**

शिक्षण प्रसारक मंडळ अणदूर संचलित जवाहर कला व विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय अणदूर राष्ट्रीय सेवा योजना आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ यांच्यातर्फे आयोजित ग्राम स्वच्छता ग्राम सर्वेक्षणासाठी युवा या वार्षिक विशेष शिबिराचे उदघाटन जळकोट (ता. तूळजापूर) येथे बुधवारी (दि.१७) करण्यात आले.

शिबिराचे उद्घाटन रामकृष्ण परमहंस महाविद्यालयाचे सेवानिवृत्त प्राध्यापक अर्जुन जाधव यांच्या करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिक्षण प्रसारक मंडळ अणदूरचे संचालक गो.का. बिच्चे गुरुजी हे होते. तर प्रमुख अतिथी म्हणून मा जि.प.सदस्य गणेश सोनटक्के, जळकोटच्या सरपं अल्काताई हिंडोळे, सेवानिवृत्त प्राचार्य डॉ.एस.एस धुमुरे, अरुण लोखंडे, प्राचार्या डॉ.मीना जाधव, अर्जु आबा कदम, संजय अंगुले, यशवंत पाटील, कस्तुराबा कारभारी, मुख्याध्यापक संगमेश्वर जळकोटे, मेघरा किलजे यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाला सुकुमार जाधव, आशिष सोनटक्के रोहित कदम यांच्यासह राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधीकारी सूर्यकांत आगलावे, प्रा.डॉ.राठोड जी.टी यांच्यासह महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा.एम.बी. बिराजदार तर प्रा.सूर्यकांत आगलावे यानी आभार मानले.

दैनिक संघर्ष समाजवादाचा

# प्रत्येक खेड्यात छोटे छोटे गांधी निर्माण झाले पाहिजेत - प्रा. अर्जुन जाधव



**नरेंद्र स्वामी**

अणदूर दि.१८– प्रत्येक खेड्यात छोटे छोटे गांधी निर्माण झाले पाहिजेत, तरच गाव स्वच्छ होईल.खेड्यात सत्य,अहिंसा,प्रेम नांदेल कारण खरा भारत हा खेड्यात वसलेला आहे. खेड्याकडे चला, खेडे स्वच्छ करा,खेड्याची सेवा करा,चर्चे तून गावची समस्या सोडवा असे मत प्रा.अर्जुन जाधव यांनी मांडले ते जवाहर महाविद्यालयाच्या जळकोट येथे झालेल्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिराच्या उदघाटन प्रसंगी बोलत होते.

शिक्षण प्रसारक मंडळ अणदूर संचलित जवाहर कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय अणदूर राष्ट्रीय सेवा योजना आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ग्राम स्वच्छता ग्राम सर्वे क्षणासाठी युवा या वार्षिक विशेष शिबिराचे उदघाटन जळकोट (ता तूळजापूर) येथे बुधवार दि.१७ जानेवारी रोजी करण्यात आले. या शिबिराचे उदघाटन रामकृष्ण परमहंस महाविद्यालयाचे सेवानिवृत्त प्राध्यापक अर्जुन जाधव यांच्यासह व्यासपीठावरील मान्यवरांच्या हस्ते महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करून व दीप प्रज्वलन करून करण्यात आले .या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिक्षण प्रसारक मंडळ अणदूरचे संचालक गो.का. बिच्चे गुरुजी हे होते. तर प्रमुख अतिथी म्हणून माजी जि.प.सदस्य गणेश सोनटक्के, जळकोटच्या सरपंच अल्काताई हिंडोळे , सेवा निवृत्त प्राचार्य डॉ.एस.एस. धुमुरे, जळकोट शालेय शिक्षण समितीचे सदस्य अरुण लोखंडे,जवाहर महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.मीना जाधव,उपसरपंच अर्जुन आबा कदम,ग्राम पंचायत सदस्य संजय अंगुले, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष यशवंत पाटील,कस्तुराबाई कारभारी जवाहर विद्यालयाचे मुख्याध्यापक संगमेश्वर जळकोटे,पत्रकार मेघराज किलजे यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती.

या कार्यक्रमाच्या प्रास्ताविकामध्ये जवाहर महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.मीना जाधव यांनी आजपर्यंत महाविद्यालयाच्या वतीने राष्ट्रीय सेवा योजना शिबिराच्या माध्यमातून करण्यात आलेल्या कामाची सविस्तर माहिती दिली व आजपासून या शिबिराच्या माध्यमातून जळकोट मध्ये करण्यात येणाऱ्या कामासाठी गावकऱ्यांनी सहकार्य करावे असे नम्र आवाहनही केले. या शिबिराच्या उदघाटन प्रसंगी सौ.सुकुमार जाधव,आशिष सोनटक्के,रोहित कदम यांच्यासह राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधीकारी सूर्यकांत आगलावे, प्रा.डॉ.राठोड जी.टी यांच्यासह महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.एम.बी. बिराजदार यांनी केले तर प्रा.डॉ.राजशेखर नळगे यांनी अनुमोदन दिले व प्रा.सूर्यकांत आगलावे यानी आभार मानले.

सकाळ
औरंगाबाद, बुधवार
१७ जानेवारी २०१८
३

# जवाहर महाविद्यालयात काव्यवाचन रंगले

अणदूर, ता. १६ (बातमीदार) : जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील मराठी भाषा विभागाच्या वतीने ता. एक ते १५ जानेवारी या कालावधित मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्यात आला.

यानिमित्त सोमवारी (ता. १५) काव्यवाचन रंगले. प्राचार्य डॉ. मीना जाधव अध्यक्षस्थानी होत्या. नळदुर्ग येथील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील मराठी विभागप्रमुख प्रा. डी. एल. भोवाळ यांची प्रमुख उपस्थिती होती. या वेळी महाविद्यालयातील प्रा. डॉ. एम. बी. बिराजदार, प्रा. डॉ. अनिता मूदकणा, प्रा. प्रसन्न कंदले, प्रा. डॉ. बी. एन. गटलेवार, प्रा. एस. आर. भारती, प्रा. डॉ. एस. एस. बाड, प्रा. डॉ. एस. के. कुलकर्णी यांच्यासह शिवकन्या ठोंबरे, सागर चव्हाण, दीपाली सावंत, सुषमा नवगिरे, स्वाती बेंद्रे, सरोजा इसाके, दीपाली बनसोडे, श्रीधर चिलगुंडे, ऋषिकेश घोडके, मिथुन राठोड, सोमनाथ माळगे या विद्यार्थ्यांनाही सहभाग घेतला. रेश्मा गायकवाड हिने सूत्रसंचालन केले. प्रा. डॉ. राजशेखर नळगे यांनी आभार मानले.

दै. दिव्य मराठी
दि. 17.01.2018

# 'जात, धर्म डोक्यातून जात नाही तोपर्यंत समाजात शांतता नाही'

अणदूर । येथील जवाहर महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा नामविस्तार दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी माजी आमदार सि. ना. आलुरे, माजी मुख्याधपक गो. का. बिचे, प्राचार्या मीना जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मार्गदर्शन करताना आलुरे म्हणाले की, जात आणि धर्म जोपर्यंत डोक्यातून जात नाही तोपर्यंत समाजात शांतता निर्माण होणार नाही. डॉ. आंबेडकर, विठ्ठल रामजी शिंदे, राजर्षी शाहू महाराज, महात्मा बसवेश्वर यांनी समाजातील भेदाभेद नष्ट करून वंचितांना न्याय दिला. येथे प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांना माणुसकीचे शिक्षण द्यावे, असे आवाहन आलुरे यांनी केले. प्रास्ताविक प्राचार्या जाधव यांनी केले. विद्यार्थी प्रतिनिधी ऋषिकेश घोडके याने मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन व आभार प्रा. डॉ. बिराजदार यांनी केले.

दै. आदर्श गावकरी

बुधवार, दि. १७ जानेवारी २०१८

# मराठी भाषेचे संवर्धन करा– प्रा. भोवाळ

## विद्यार्थ्यांनी घेतला काव्यवाचनाचा आनंद

**अणदूर / प्रतिनिधी**

भाषा माणसाला समृद्ध करते म्हणून भाषेला जिवंत ठेवण्याचे कार्य मानवाला करायचे आहे. मराठी भाषा अत्यंत सुंदर असून चार हजार भाषा आणि साठ हजार बोलीत मराठी 'माऊली' म्हणून कार्य करत आहे. म्हणून मराठी भाषेचे संवर्धन आपण करूया, असे मत प्रा.डी.एल.भोवाळ यांनी मांडले.

अणदूर येथील जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील मराठी भाषा विभागाच्यावतीने दि.१ ते १५ जानेवारी २०१८ या कालावधीत मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्यात आला. या निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. समारोपाच्या कार्यक्रमात प्रा.भोवाळ बोलत होते. यानिमित्त यावेळी काव्यवाचनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून जवाहर महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.मीना जाधव उपस्थित होत्या. प्रा. डॉ.एम.बी. बिराजदार, प्रा.डॉ.अनिता मूदकणा, प्रा.प्रसन्न कंदले, प्रा.डॉ.बी.एन.गटलेवार, प्रा.एस.आर.भारती, प्रा.डॉ. एस.एस.बाड, प्रा.डॉ.एस.के. कुलकर्णी यांच्यासह. ठोंबरे शिवकन्या चव्हाण सागर, दिपाली सावंत, सुषमा नवगिरे, स्वाती बेंद्रे, इसाके सरोजा, बनसोडे दीपाली, श्रीधर चिलगुंडे, ऋषिकेश घोडके, मिथुन राठोड, सोमनाथ माळगे या विद्यार्थी व विद्यार्थीनींनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. विविध विषयांवरील काव्यवाचन केले. अध्यक्षीय समारोपामध्ये प्राचार्या डॉ.मीना जाधव यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. अशा कार्यक्रमाच्या माध्यमातून व सहभागातूनच विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्त्व विकास होत असतो, असे मत व्यक्त केले. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक उपस्थित होते. सूत्रसंचालन रेश्मा गायकवाड या विद्यार्थिनीने केले तर आभार प्रा.डॉ.राजशेखर नळगे यांनी मानले.

---

उस्मानाबाद, शनिवार, १३ जानेवारी २०१८ | ४

# मानवाधिकार जागृतीला कृतीची जोड द्यायला हवी: प्रा. विलास बेत

**प्रतिनिधी । अणदूर**

मानवाला स्वातंत्र्य, समता व बंधुता यांच्याबरोबरच मानवाधिकार दिले आहेत. मानवाधिकार जागृतीबरोबरच त्याला कृतीची जोड देऊन प्रत्येक व्यक्तीला घटनेप्रमाणे जगण्याचा अधिकार असल्याची जाणीव करून द्यावी, असे आवाहन सेवानिवृत्त प्राध्यापक विलास बेग यांनी केले.

अणदूर येथे जवाहर महाविद्यालय व विद्यापीठ अनुदान आयोगाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मानवी हक्क या विषयावरील व्याख्यानमालेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी माजी आमदार सि. ना.आलुरे होते. प्रथम डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू डॉ. जनार्धन वाघमारे यांच्या हस्ते व्याख्यानमालेचे उद्घाटन झाले. प्रा. बेत म्हणाले की, जगण्याचा अधिकार कोणीही हिरावून घेऊन शकत नाही. यावेळी डॉ. वाघमारे यांनीही मनोगत व्यक्त केले. माजी आमदार आलुरे यांनी अध्यक्षीय समारोप केला. सूत्रसंचालन व आभार प्रा. ए. बी. बिराजदार यांनी, संयोजन प्राचार्य डॉ. एम.बी. जाधव यांनी केले.

# 'मानवी हक्काची पायमल्ली होऊ देऊ नका'

अणदूर, (प्रतिनिधी) :

देशात लोकशाही जिवंत आहे, म्हणूनच लोकांना मान-सन्मान, इज्जत आहे. तेव्हा मानवी हक्काची पायमल्ली होऊ देऊ नका, असे मत थोर विचारवंत व स्वामी रामानंद तिर्थ विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू डॉ. जनार्दन वाघमारे यांनी व्यक्त केले.

अणदूर येथे जवाहर महाविद्यालयाच्या वतीने आयोजित 'मानवी हक्क' या विषयावरील आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार सी. ना. आलुरे गुरूजी होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. विलास बेत, प्राचार्या डॉ. मीना जाधव, श्रीयुत स्वामी उपस्थित होते.

वाघमारे म्हणाले की, माणूस हा कोणत्याही जातीचा, धर्माचा, पंथाचा, वर्णाचा, रंगाचा असला तरी तो माणूसच आहे. त्यामुळे माणसाला माणूस म्हणून वागवणं हा मानवी अधिकार आहे, असेही ते म्हणाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. मीना जाधव यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. एम. बी. बिराजदार यांनी केले. प्रा. राजशेखर नळगे यांनी आभार मानले. यावेळी जवाहर महाविद्यालय विद्यालयातील शिक्षक, प्राध्यापक, विद्यार्थी, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

दिनांक 12/01/2018.

nail.com

दैनिक **संघर्ष समाजवादाचा** जिल्हा

### कृषी विभागाच्या यांत्रिकीकरण योजनेसाठी शेतक-यांनी अर्ज दाखल करण्याचे आवाहन

उस्मानाबाद,दि.११, उन्नत शेती समृद्ध शेतकरी मोहीम २०१७ ते २०१८ अंतर्गत कृषी विभागाच्या प्रचलित योजनेतंर्गत यांत्रिकीकरण करिता इच्छुक शेतक-यांकडून अर्ज मागविण्यात आले आहेत. तरी २० जानेवारी २०१८ पर्यंत उस्मानाबाद येथील मध्यवर्ती प्रशासकीय इमारती मधील तालुका कृषी कार्यालयात दाखल करावेत. असे आवाहन उस्मानाबाद तालुका कृषी आधिका-यांनी केले आहे.

तसेच विहीत नमुन्यातील अर्ज कार्यालयीन वेळेतच स्वीकारले जातील, आलेल्या प्राप्त अर्जाची सोडतीनुसार प्राधान्यक्रम काढूनच लाभार्थ्यांची निवड करण्यात येईल. यामध्ये पॉवर टिलर/ स्वयंचलित यंत्रे रिपर कम बाईंडर/ रिपर न्यूमॅटीक/ इतर प्लॉन्टर/ कल्टीवेटर/ टाव्हेटर/सर्व प्रकारचे प्लान्टर त व बी टोकन यंत्र पावर टर/ शुगर केन थ्रेश कटर/

## मानवाधिकार जागृतीला कृतीची जोड हवी – प्रा. बेत



अणदूर दि.११ (प्रतिनिधी)- मानवाला स्वातंत्र्य, समता व बंधुता यांच्या बरोबरच मानव अधिकार देण्यात आले आहेत. मानवाधिकार जागृती बरोबरच त्याला कृतीची जोड देवून प्रत्येक माणसाला घटनेप्रमाणे जगण्याचा अधिकार असल्याची जाणीव करुन द्यावी असे आवाहन सेवानिवृत्त प्राध्यापक विलास बेत सोलापूर यांनी केले.

येथे जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय व विद्यापीठ अनुदान आयोग, दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने मानवी हक्क व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. हुतात्मा स्मारकात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार सि.ना. आलुरे गुरुजी हे होते तर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. जनार्दन वाघमारे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी पुढे बोलताना प्रा. बेत यांनी आज दलित, बालक व स्त्रियावरील अत्याचार वाढत चालले आहेत. अशी खंत व्यक्त करुन समाजातील मान्यवरांनी अन्यायाच्या विरोधात ठामपणे उभे राहुन न्याय मिळवून देण्याची गरज आहे.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मानव अधिकाराची सविस्तर माहिती दिल्यास ते सक्षमपणे उभे राहतील असा विश्वास व्यक्त केला. जगण्याचा अधिकार कोणीही हिरावून घेवू शकत नाही व मानवाधिकाराचे उल्लंघनही करु शकत नाही. यासाठी विशेषत: ग्रामीण भागात प्रबोधन व जागृतीची गरज असल्याचे प्रा. बेत यांनी स्पष्ट केले.यावेळी डॉ. वाघमारे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. तर आलुरे गुरुजीनी अध्यक्षीय समारोप केला. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार प्रा. एम. बी.बिराजदार यांनी केले. या कार्यक्रमाचे संयोजन प्राचार्या डॉ. एम.बी. जाधव, समन्वयक डॉ. आर. एस. नळगे व प्रा. बिराजदार यांनी केले होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. सत्येंद्र राऊत, डॉ. गटलेवार, डॉ. सुर्यवंशी, डॉ. कुलकर्णी, डॉ. राजपूत व प्रा. वाहुळे यांनी परिश्रम घेतले.

लोकमत औरंगाबाद, शुक्रवार, दि. १२ जानेवारी २०१८ ३

# माणसाला माणूस म्हणूनच वागवा

## वाघमारे : व्याख्यानास प्रतिसाद

लोकमत न्यूज नेटवर्क

अणदूर : माणूस हा कोणत्याही जातीचा, धर्माचा, पंथाचा, वर्णाचा, रंगाचा असला तरी तो माणूसच आहे. त्यामुळे माणसाला माणूस म्हणून वागणूक हा मानवी अधिकार आहे, असे मत थोर विचारवंत व स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू डॉ. जनार्धन वाघमारे यांनी व्यक्त केले.

अणदूर येथे जवाहर महाविद्यालयाच्या वतीने आयोजित मानवी हक्क व्याख्यान मालिकेमधे ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार सि.ना. आलुरे गुरुजी हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून विचारवंत प्रा. विलास बेत, प्राचार्या डॉ. मीना जाधव, स्वामी उपस्थित होते.

पुढे बोलताना वाघमारे म्हणाले की, देशात लोकशाही जिवंत आहे म्हणूनच लोकांना मान, सन्मान' इज्जत आहे. त्यामुळे मानवी हक्काची पायमल्ली होणार नाही, याची प्रत्येकाने काळजी घेण्याची गरज आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. मीना जाधव यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.एम.बी. बिराजदार यांनी तर आभार प्रा.राजशेखर नळगे यांनी मानले. यावेळी जवाहर महाविद्यालय, विद्यालयातील शिक्षक, प्राध्यापक, विद्यार्थी, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Scanned by CamScanner

उस्मानाबाद, बुधवार, १० जानेवारी २०१८ | ३

**श्रमदान शिबिर** आमदार बसवराज पाटील यांचे कार्यक्रमात मत, शिबिरात विद्यार्थ्यांनी श्रमदानातून गावातील स्वच्छता केली

# सुसंस्कारी समाजासाठी युवकांनी पुढाकार घ्यावा

प्रतिनिधी । उमरगा

देशाला सशक्त व मजबूत करण्यासाठी एकात्मता, पाणी व पर्यावरणाचे संवर्धन, स्वच्छता आणि महिलांची सुरक्षितता आदिंसह समाजातील मतभेदाचे निर्मूलन करून सुसंस्कारीत समाज घडविण्यासाठी युवकांनी पुढाकार घ्यावा, असे मत औश्याचे आमदार बसवराज पाटील यांनी व्यक्त केले.

लोहारा तालुक्यातील तोरंबा येथे श्री माधवराव पाटील महाविद्यालय मुरुमच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वच्छ ग्राम व जलसंवर्धनासाठी युवा विशेष शिबिराचे सोमवारी (दि. ८) समारोप करण्यात आला. त्यावेळी आमदार पाटील बोलत होते. यावेळी जिल्हा बँकेचे माजी अध्यक्ष बापूराव पाटील, पंचायत समितीच्या सभापती ज्योती पत्रिके, उपसभापती नमीता पाटील, नगराध्यक्षा अनिता अंबर, जिप सदस्य शोभा तोरकडे, हेमलता रणखांब, विठ्ठलसाईचे संचालक दिलीप भालेराव, तालुकाध्यक्ष अमोल पाटील, रासेयो जिल्हा समन्वयक प्रा. डॉ. सूर्यकांत आगलावे, धोंडीराम चव्हाण, तात्याराव चव्हाण, तोरंबा सरपंच वर्षा चव्हाण, उपसरपंच स्वप्नील चव्हाण, प्राचार्य डॉ. अशोक सपाटे, तानाजी माटे आदींची उपस्थिती होती. पुढे बोलताना आमदार पाटील म्हणाले की, नागरिकांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. लोकसहभागातून अधिकाधिक जलसंधारणांच्या कामासाठी युवकांनी पुढाकार घेणे गरजेचे आहे. यावेळी



डॉ. सूर्यकांत आगलावे, माजी नगराध्यक्ष प्रा. सुधीर अंबर, अमोल पाटील, योगेश गुरव आदिंची भाषणे झाली. प्रा. दिनकर बिराजदार, बाबासाहेब चव्हाण, उपप्राचार्य डॉ. चंद्रकांत बिराजदार, डॉ. राम बजगिरे, डॉ. जयश्री सोमवंशी, ग्रामसेवक एम. टी. जगताप, शाळेचे मुख्याध्यापक कुलकर्णी, मारुती इंगळे, दिलीप घाटे, मशाक कागदी आदिंनी शिबिरासाठी पुढाकार घेतला. प्रा. सुभाष हुलपल्ले यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. विलास खडके यांनी आभार मानले. यावेळी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.